# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः29.04.2025** **वारःमंगळवार**

---

1) 26 राफेल सागरी लढाऊ विमानं खरेदीसाठी भारताचा फ्रान्ससोबत करार
2) पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान आणि संरक्षण मंत्र्यांची चर्चा
3) राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू  यांच्या हस्ते पद्म सन्मानांचं, वितरण महाराष्ट्रातील 9 मान्यवरांचा समावेश
4) आजपासून सुरू होणाऱ्या पवित्र चारधाम यात्रेच्या पार्श्वभूमीवर उत्तराखंड मधील सुरक्षा व्यवस्थेत वाढ आणि
5) आयपीएल चषक क्रिकेट स्पर्धेत काल वैभव सूर्यवंशीच्या चमकदार खेळामुळे राजस्थान रॉयल्सचा गुजरात टायटन्सवर दणदणीत विजय

**<u>राफेल करार</u>**

भारतानं फ्रान्सकडून 26 राफेल सागरी लढाऊ विमानं खरेदी करण्याच्या करारावर काल स्वाक्षरी केली. भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि फ्रान्सचे सशस्त्र दल प्रमुख सॅबॅस्टीअन लेकोर्नु यांनी नवी दिल्ली इथं या आंतर सरकारी करारावर स्वाक्षरी केली. या 26 राफेल सागरी लढाऊ विमानांपैकी 22 विमानं ही एक आसन व्यवस्था असलेली आणि 4 विमानं दुहेरी आसन व्यवस्था असलेली असतील. भारतीय नौदलाच्या मागणी नुसार या विमानांची रचना करण्यात आली असून 2030 पर्यंत ही सर्व विमानं लष्करी विमानांच्या ताफ्यात दाखल होणार आहेत.

**<u>पं – संरक्षण मंत्री भेट</u>**

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी काल नवी दिल्ली इथं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान पुढील कारवाईविषयी या दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. तत्पूर्वी सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांनी संरक्षण मंत्र्यांना महत्वपूर्ण निर्णयांची माहिती दिल्यानंतर ही बैठक ठरवण्यात आली होती.

दरम्यान पंतप्रधान आज नवी दिल्ली इथं होणाऱ्या युग्म या संमेलनामध्ये सहभागी होणार आहेत. संस्कृतीमधील संगम म्हणजे युग्म आणि ही अशा प्रकारची पहिलेच धोरणात्मक संमेलन आहे ज्यामध्ये सरकार,शैक्षणिक संस्था,उद्योग आणि नवोन्मेषकांच्या नेत्यांना सहभागी होता येतं. वाधवानी फाउंडेशन

आणि सरकारी संस्थांच्या संयुक्त गुंतवणुकीसह एकंदर 1 हजार 400 कोटी रुपयांच्या सहयोगी प्रकल्पातून चालणाऱ्या देशाच्या नवोन्मेष प्रवासात हे संमेलन योगदान देईल.

**<u>पद्म</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल राष्ट्रपती भवन इथं आयोजित करण्यात आलेल्या समारंभात पद्म सन्मान प्रदान करण्यात आले. यामध्ये ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक शेखर कपूर आणि गझल गायक पंकज उधास यांना 'पद्मभूषण सन्मान' प्रदान करण्यात आला. पंकज उधास यांच्या पत्नीने हा सन्मान स्विकारला. मारोती चीतमपल्ली यांना वन्यजीव अभ्यासक,साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील तर चैत्राम पवार यांना पर्यावरण ,वनसंवर्धन, आणि सामाजिक क्षेत्रातील कामासाठी पद्मश्री सन्मान देण्यात आला. अरुंधती भट्टाचार्य, पवनकुमार गोयंका व्यापार आणि उद्योग क्षेत्र, तर जस्पिंदर नरुला, रोणू मजुमदार, वासुदेव कामत यांना कला क्षेत्रातील योगदानासाठी पद्मश्री सन्मानानं गौरविण्यात आलं.

**<u>व्हेवज</u>**

मुंबईत येत्या १ मे ते ४ मे दरम्यान वेव्ज अर्थात 'विश्व दृकश्राव्य मनोरंजन शिखर बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्याचं उद्घाटन होणार असल्याची माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत दिली. या कार्यक्रमाचं यजमानपद महाराष्ट्र शासनाकडं आहे.

मुंबईमध्ये होणाऱ्या वेव्हज २०२५ या शिखर परिषदेचं आयोजन महाराष्ट्रासाठी अभिमानाची गोष्ट आहे, नागरिकांनी या परिषदेतील दालनांना भेट द्यावी असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. जागतिक स्तरावर भारताच्या सर्जनशील उत्कृष्टतेचं प्रदर्शन करण्याची एक मोठी संधी असल्याचं ते म्हणाले.

**<u>राणा कोठडी</u>**

26/11 हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणा याच्या कोठडीमध्ये दिल्लीतील राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या मागणीनंतर न्यायालयानं 12 दिवसांची वाढ केली आहे. अमेरिकेतून नुकतंच प्रत्यार्पण केलेल्या राणाला काल राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या न्यायालयासमोर हजर करण्यात आलं.

**<u>कार्यशाळा</u>**

राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशनअंतर्गत एम एस एम ई अर्थात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रातील संधी शोधण्यासाठी नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयातर्फे आज नवी दिल्लीमधील अटल अक्षय ऊर्जा भवन इथं विशेष कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यशाळेमध्ये शाश्वत हायड्रोजन आधारित अर्थव्यवस्थेला आकार देण्यासाठी एमएसएमईच्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा विचार केला जाणार आहे. या उदयोन्मुख क्षेत्रात नावीन्य आणि विकासाला गती देण्यासाठी एमएसएमईचे घटक महत्त्वपूर्ण ठरणार असून उपकरणे विकसित करण्यासाठी तंत्रज्ञान सहकार्य, हरित हायड्रोजन पुरवठा साखळीतील संधी, बायोमास

मार्गांचा वापर करून विकेंद्रित हायड्रोजन उत्पादन आणि मूल्य साखळीतील गुंतवणुकीस उत्तेजन देण्याची रणनीती या प्रमुख विषयांचा ऊहापोह यामध्ये केला जाणार आहे.

**<u>वेव्स 2025</u>**

मुंबईत होणाऱ्या वेव्स 2025 या कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी 1 मे या दिवशी वेव्स ऑफ इंडिया या अल्बमचं अनावरण करण्यात येणार आहे. या अल्बममध्ये 5 गाणी असून त्यांची रचना ऑस्कर विजेत्या गीतकार एम. एम. किरवाणी यांनी केलेली आहे. संगीत अकादमी पुरस्कारप्राप्त संगीतकार ए. आर. रहमान यांनी सत्यम शिवम् सुंदरम या गीताला संगीत दिल आहे. गीतकार प्रसून जोशी आणि गायक संगीतकार शंकर महादेवन यांनी ऊंचा आसमान हे गीत तयार केलं आहे. 3 वेळा ग्रामी पुरस्कार प्राप्त गायक रिकी केज यांनी सिंफनी ऑफ इंडिया हे गीत तर देसी पॉपचे निर्माते मीत ब्रदर्स यांनी शुभारंभ आणि हाय इन द् स्काय ही गीतं तयार केली आहेत. 5 गाण्यांचा हा अल्बम तयार करण्यासाठी 5 विशिष्ट आणि विभिन्न शैलींचा वापर करण्यात आला आहे.

**<u>पोप उत्तराधिकारी</u>**

दिवंगत पोप फ्रान्सिस यांचा उत्तराधिकारी निवडण्यासाठीची गोपनीय बैठक पुढील महिन्याच्या ७ तारखेपासून सुरू होणार असल्याचं व्हॅटिकननं जाहीर केलं आहे. गेल्या २१ एप्रिल रोजी पोप फ्रान्सिस यांचं निधन झाल्यानंतर सध्याच्या काळात व्यवस्थापन करणाऱ्या कार्डिनल्स चर्चच्या अधिवेशनात हा निर्णय घेण्यात आला. यामधील परंपरेनुसार सिस्टीन चॅपलमध्ये मतदान होणार असून या प्रक्रियेच्या तयारीसाठी सिस्टीन चॅपल कालपासून पर्यटकांसाठी बंद करण्यात आलं आहे. जगभरातील २२५ कार्डिनलपैकी ८० वर्षांखालील केवळ १३५ कार्डिनल या निवडणुकीत मतदान करण्यास पात्र आहेत.

**<u>चार धाम यात्रा</u>**

पवित्र चार धाम यात्रा आजपासून सुरू होत असून उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी काल या यात्रेच्या व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी राज्यभरातील जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेतली. येत्या दोन मे पासून भाविकांना केदारनाथ धाममध्ये दर्शन घेता येणार आहे. चार धाम यात्रा 2025 साठीच्या नोंदणीही कालपासून सुरू झाली. दिव्यांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक आणि परदेशी नागरिकांसाठी विशेष काऊंटर उभारण्यात येत आहेत. तसंच २० मोफत नोंदणी काऊंटर सुरू करण्यात आले आहेत, असं धामी यांनी आपल्या समाज माध्यमांवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे. यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ आणि बद्रीनाथ या पवित्र स्थळांवर हजारोंच्या संख्येनं येणाऱ्या भाविकांच्या गर्दीचं व्यवस्थापन करण्यासाठी उत्तराखंड सरकारनं चोख व्यवस्था केली असून या यात्रेच्या पार्श्वभूमीवर राज्यातही सुरक्षा व्यवस्था कडक करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

**<u>वीजपुरवठा</u>**

स्पेन आणि पोर्तुगालमध्ये अचानक मोठ्या प्रमाणात वीजपुरवठा खंडित झाल्यानं काल दैनंदिन जनजीवन विस्कळीत झालं होतं. आज सकाळपासून हळूहळू वीजपुरवठा सुरळीत होत आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यानं विमानसेवा ठप्प झाली, सार्वजनिक वाहतूक आणि रुग्णालयातील सेवाही विस्कळीत झाल्या

होत्या. मात्र, वीजपुरवठा खंडित होण्याचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. या अनपेक्षितरीत्या उद्भवलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर स्पेनच्या गृह मंत्रालयानं राष्ट्रीय आणीबाणी जाहीर केली असून देशभरात 30 हजार पोलीस अधिकारी तैनात केले आहेत. दोन्ही देशांमध्ये मंत्रिमंडळाच्या तातडीच्या बैठका झाल्या आणि नेत्यांनी परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांनी देशाच्या निम्म्या भागाचा वीजपुरवठा पूर्ववत झाल्याचं आज म्हटलं आहे. पोर्तुगालचे पंतप्रधान लुईस मॉन्टेनेग्रो यांनी या संकटामागे सायबर हल्ला असल्याची शक्यता नाकारली असून, पोर्तुगालमधील परिस्थिति पूर्ववत होण्यास एक आठवडा लागू शकतो, असं स्पष्ट केलं आहे.

सुदिर्मन

चीनमध्ये शियामेन इथं सुरू असलेल्या बीडब्ल्यूएफ सुदिरमन करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीत 'ड' गटातील महत्त्वपूर्ण लढतीत आज भारताचा सामना इंडोनेशियाशी होणार आहे. गेल्या रविवारी डेन्मार्ककडून १-४ असा पराभव पत्करावा लागल्यानं भारतीय संघाची वाटचाल सुरुवातीलाच कठोर झाली आहे. गटातील अव्वल दोन संघांनाच पुढील फेरीत प्रवेश मिळत असल्यानं उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करण्यासाठी भारताला आज इंडोनेशियावर विजय मिळवणं अत्यावश्यक आहे. सुदीरमन करंडक स्पर्धेत भारताने २०११ आणि २०१७ मध्ये सर्वोत्तम कामगिरी करत उपांत्यपूर्व फेरी गाठली होती.

क्रिकेट

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत 14 वर्षांच्या वैभव सूर्यवंशी या खेळाडूच्या 38 चेंडूतील 101 धावांच्या जोरावर राजस्थान रॉयल्सने गुजरात टायटन्सचा आठ गडी राखून पराभव केला. वैभवने आपल्या या तडाखेबंद खेळीत सात चौकार आणि 11 षटकार लगावले. आय पी एल च्या इतिहासात सर्वात कमी वयात वेगवान शतक झळकवणारा खेळाडू म्हणून त्याची नोंद झालेली आहे. गुजरात टायटनच्या 209 धावांना प्रत्युत्तर देताना राजस्थान रॉयल्सने 25 चेंडू राखत हे आव्हान पार केलं.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**